सहायक मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा - २०११

परीक्षा दि: २७ ऑगस्ट,2011

Code : **RWM**

# A

पेपर क्र. १

प्रश्नपुस्तिका क्रमांक
BOOKLET No. **100521**

**प्रश्नपत्रिका क्र. 1**

**एकूण प्रश्न : 150**

**वेळ : $2\frac{1}{2}$ (अडीच) तास**

**मराठी व प्रशासनिक लेखन**

**एकूण गुण : 300**

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 150 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | केंद्राची संकेताक्षरे | | | | | | | शेवटचा अंक |

(2) आपला परीक्षा क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची अचूक उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

**SEAL**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरुद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

कच्च्या कामासाठी जागा

1. Bela was made to sing by the audience – या वाक्यातील प्रयोग ओळखा.
   (1) कर्तरी प्रयोग (2) भावे प्रयोग
   (3) संकीर्ण प्रयोग (4) कर्मणी प्रयोग

2. 'Mandar could not go to learn English' - या इंग्रजी नकारार्थी वाक्याचे मराठीतील होकारार्थी वाक्य कोणते ?
   (1) मंदार इंग्रजी शिकायला गेलेला नव्हता (2) मंदार इंग्रजी शिकायला जाऊ शकला
   (3) मंदार इंग्रजी शिकायला जाऊ शकतो (4) मंदार इंग्रजी शिकायला गेला असेल

3. The storm in Orissa has rendered thousands of people homeless – या वाक्यातील कर्ता ओळखा.
   (1) पाऊस (2) ओरिसा
   (3) लोक (4) वादळ

4. "The one who is associated with another in the same employment" – या इंग्रजी वाक्यबंधासाठी मराठीतील योग्य पर्यायी शब्दाची निवड करा.
   (1) सभासद (2) सहकारी
   (3) सहोदर (4) समवयस्क

5. The watchman will be sitting at the main gate हे विधान कोणत्या काळात आहे ?
   (1) वर्तमानकाळ (2) चालू भूतकाळ
   (3) चालू भविष्यकाळ (4) चालू वर्तमानकाळ

6. "Wife" या शब्दाला मराठीमध्ये असणारा अनेकवचनी शब्दाचा पर्याय ओळखा.
   (1) बायको (2) सख्या
   (3) लग्नाच्या बायका (4) बाया

7. 1) She is not very intelligent.
   2) She is little intelligent.
   वरीलपैकी कोणते विधान संयोगदृष्ट्या अचूक आहे ?
   (1) दोन्ही विधाने अचूक आहेत (2) पहिले विधान अचूक आहे
   (3) दोन्ही विधाने चूक आहेत (4) दुसरे विधान अचूक आहे

8. 'The phases of the moon' – या इंग्रजी पदबंधासाठी मराठीतील पर्यायी पदबंध निवडा.
   (1) चंद्राचा विकास (2) चंद्राच्या कला
   (3) चंद्राची पोकळी (4) चंद्राची विविधता

कच्च्या कामासाठी जागा

9. 'The Philosopher's Stone' – या इंग्रजी शब्दाचा मराठीत अर्थ लिहा.
   (1) A gem
   (2) A stone
   (3) A stone which turns iron into gold
   (4) Gold

10. Flag या शब्दासाठी मराठी अर्थाचा नपुंसकलिंगी शब्द ओळखा.
   (1) ध्वज
   (2) दर्शकपट्टी
   (3) पताका
   (4) निशाण

11. चुकीचा अर्थ असलेली जोडी ओळखा.
   (1) Field officer – क्षेत्राधिकारी
   (2) Rebel – बंडखोर
   (3) Fatalist – लढवय्या
   (4) Dutiful – कर्तव्यतत्पर

12. 'मराठी हा विषय आमच्या महाविद्यालयात <u>ऐच्छिक</u> स्वरूपाचा आहे' - अधोरेखित शब्दाचा इंग्रजीतील विरुद्धार्थी शब्द निवडा.
   (1) Optional
   (2) Tentative
   (3) Mandatory
   (4) Often

13. 'डोळ्यांचे पारणे फिटणे' या वाक्प्रचाराचा इंग्रजी अर्थ ______
   (1) to enjoy the sight of someone
   (2) to get great satisfaction
   (3) to be vigilant
   (4) to have a secret desire for

14. निर्णय घेणे या क्रियापदापासून खालील इंग्रजी नाम तयार होते.
   (1) decided
   (2) decidedness
   (3) decision
   (4) deciding

15. 'ती गुलाबी उषा म्हणजे परमेश्वराचे प्रेम जणू' मराठी भाषेतील उत्प्रेक्षा अलंकाराच्या या विधानाशी साधर्म्य दाखविणारे इंग्रजी वाक्य कोणते ते लिहा ?
   (1) The rosy morning is like love of God.
   (2) The rosy dawn is as if love of God.
   (3) The pink morning is like love of God.
   (4) The fresh morning is as if love of God.

16. 'नाममुद्रित पत्र' या शब्दासाठी खालील योग्य पर्याय सांगा.

(1) Letter head

(2) Letter of advice

(3) Letter of authority

(4) Letter of introduction

---

17. मेजर म्हणाले की, त्यांना त्या संध्याकाळी तिथे उपस्थित राहण्यात खूप आनंद झाला. या विधानाचे इंग्रजीतील प्रत्यक्ष विधान (Direct Speech) करा.

(1) Major said, " I am here to be happy with you today".

(2) The Major said, "It gives me great pleasure to be here this evening".

(3) The Major thought, "I am happy this evening".

(4) The Major felt, "He was happy to be present on that evening".

---

18. 'लक्ष्मी चंचल असते' – या मराठी वाक्यबंधासाठी खालील इंग्रजीतील कोणते योग्य भाषांतर निवडाल ?

(1) Laxmi is moveable.

(2) God is everywhere.

(3) Rich person is very great.

(4) Wealth has wings.

---

19. 'सचिन क्रिकेट खेळतो' या वर्तमानकाळी विधानाचे इंग्रजीतील प्रश्नार्थक रूप कोणते ?

(1) Did Sachin play cricket ?

(2) Do Sachin play cricket ?

(3) Why Sachin play cricket ?

(4) Does Sachin play cricket ?

---

20. 'परिश्रमाशिवाय यश नाही त्यासाठी प्रामाणिकपणा हेच सर्वोत्तम धोरण होय' – या वाक्यातील 'प्रामाणिकपणा हेच सर्वोत्तम धोरण होय'' या वाक्यबंधासाठी इंग्रजीतील कोणत्या पर्यायी वाक्यबंधाची निवड कराल ?

(1) Slow and steady wins the race.

(2) Honesty is the best policy.

(3) Well begun is half done.

(4) Work is worship.

---

कच्च्या कामासाठी जागा

खालील उतारा वाचून विचारलेल्या प्रश्न क्रमांक **21** ते **25** ची उत्तरे लिहा :

देवाच्या दारात सारे सारखेच, असं आपण म्हणतो, पण देवळाच्या दारात मात्र साऱ्यांना समान वागणूक मिळत नाही, असा अनुभव आजही येतो. भारतातील हिंदू देवालयांमधून सगळ्यांना प्रवेश खुला करणारा कायदा अस्तित्वात असला तरी त्याची बूज न राखता व्यवहार होत आहेत, असंही बऱ्याचदा आढळतं. केवळ ठराविक जातींनाच नव्हे तर स्त्रियांनाही विशिष्ट देवांच्या देवळांमधून प्रवेश न देण्याची परंपरा आपल्याकडे शतकांपासून आहे.

अलिकडे मात्र अशा तऱ्हेच्या बंधनांना झुगारलं पाहिजे असा विचार पुढे येऊ लागला आहे. महाराष्ट्रात स्त्रियांना प्रवेश निषिद्ध असलेली देऊळं म्हणजे एक कार्तिकेयाचं; आणि दुसरे शनी शिंगणापूर. शनी शिंगणापूर येथील शनीच्या देवळाच्या चौथऱ्यावरून स्त्रियांना शनिदेवाचे दर्शन घेण्यास मज्जाव आहे. त्याविरुद्ध स्त्री संघटनांनी आंदोलनही केलं होतं. कारण असा भेदभाव करणं घटनेतील समानतेच्या तत्त्वाविरुद्ध आहे अशी त्यांची भूमिका होती. दुसरे उदाहरण आळंदीचे. स्त्रियांना तिथल्या अजानवृक्षाखाली बसून ज्ञानेश्वरी वाचण्यास मनाई आहे. आळंदीला अखिल भारतीय साहित्य संमेलन झालं त्यावेळी आंदोलन करुन ही परवानगी मिळवावी लागली.

कार्तिकेयाच्या देवळात स्त्रीवर्गाने न जाण्याची प्रथा फार पूर्वीपासून आहे. लहान मुलींनाही तिथे प्रवेश दिला जात नाही. दक्षिणेत मात्र तसं नाही. तिथे कार्तिकेयाच्या मंदिरात महिला जात असतात. मात्र अय्यप्पाच्या देवळात स्त्रियांना प्रवेश बंदी आहे.

या देवतेची विशिष्ट आख्यायिका आहे. अय्यप्पा हा भस्मासूराचा वध करण्यासाठी घेतलेलं विष्णूचं मोहिनीरूप आणि शिव यांच्या संयोगातून जन्मला आहे अशी कथा आहे. दरवर्षी संक्रांतीच्या काळात मकर ज्योतीचं दर्शन घेण्यासाठी केरळातील शबरीमलय इथे असलेल्या अय्यप्पाच्या सुप्रसिद्ध मंदिराची यात्रा असते. या यात्रेच्या बराच काळ आधीपासून पुरुष मंडळी अय्यप्पाचं व्रत अंगीकारतात आणि शबरीमलय यात्रा करुन ते समाप्त करतात. ब्रह्मचर्याचं पालन या काळात करावं लागतं म्हणून शक्यतो स्त्रीचं दर्शनही नको अशी यामागची एक भूमिका आहे.

नव्या आणि बदलत्या वातावरणात तसंच भारतीय घटनेनेही समानतेचं तत्त्व मान्य केलं असल्याने स्त्रिया आणि पुरुष यांच्यात असा भेदभाव करणं योग्य नाही अशी भूमिका घेऊन मंदिर प्रवेशाचा आग्रह धरणारे आहेत. केरळातील राज्य सरकारचाही स्त्रियांना मंदिर प्रवेश देण्यास पाठिंबा आहे.

मुळात मंदिरात विशिष्ट गटाला प्रवेश नाकारण्यामागे काय हेतू असू शकतो, हा विचार केला पाहिजे. मंदिरात येणारा कोणीही देवतेचा अवमान करण्यासाठी नक्कीच येत नाही, तरीही त्यास तिथे येऊ दिलं जात नसेल तर ते नक्कीच आक्षेपार्ह आहे. तसंच विशिष्ट जात, धर्म किंवा स्त्री असणं हे मंदिर प्रवेश नाकारण्याचं कारण होऊ शकत नाही. त्यामुळे उलट राज्यघटनेची बेअदबी होते. दुसऱ्यावर श्रेष्ठत्त्वाचा अधिकार गाजवण्याची जी प्रवृत्ती माणसात असते त्याचाच आविष्कार अशा तऱ्हेच्या बंदीत स्पष्टपणे दिसतो. हजारो वर्षांपासून स्त्रिया आणि दलित यांना भेदभावाची वागणूक दिली गेली. आपण पुरुष आहोत एवढेच एक कारण आपण श्रेष्ठ असण्यासाठी पुरेसे आहे असं एका मोठ्या पुरुष वर्गाला वाटत आलं आहे. त्याची परिणती आपण संपूर्ण समाज पुरुष प्रधान बनण्यात होतांना अनुभवलं आहे आणि अनुभवत असतो. शबरीमलय किंवा शनी शिंगणापूर सारखी आणखीही उदाहरणं असतील. अशा प्रकरणात पुरुष सत्ता आणि धर्म सत्ता हातात हात घालून येत असल्यामुळे दिसून येणारा प्रभाव हा बराच टिकून राहणार हे उघड आहे. म्हणूनच परंपरा कितीही अन्यायकारक असल्या तरी त्यांच्याविरुद्ध बोलण्यास

फार कुणी पुढे येत नाही. धार्मिक दहशत मनांवर राज्य करत असते या गोष्टीचा मग फायदा उठवला जातो. एक तऱ्हेची हुकूमशाही यातून प्रस्थापित होत जाते. विशेषत: दक्षिणेकडील अनेक मंदिरांमधून असणारी खास प्रकारच्या पोशाखाची सक्ती ही सुद्धा यामुळेच अस्तित्वात आली आहे.

**21.** आजही देवाच्या दारात ____________

(1) फक्त स्त्रियांनाच प्रवेश मिळतो

(2) साऱ्यांना समान वागणूक मिळत नाही

(3) फक्त दलितांनाच प्रवेश नाकारला जातो

(4) कुमारिका व वृद्धस्त्रिया यांनाच प्रवेश मिळतो

---

**22.** स्त्रियांना प्रवेश निषिद्ध असलेली महाराष्ट्रातील मंदिरे ____________

(1) कार्तिकेय आणि शनी शिंगणापूर (2) आळंदीचे ज्ञानेश्वर मंदिर

(3) कार्तिकेय आणि अय्यप्पा यांची मंदिरे (4) सर्व मंदिरे

---

**23.** अय्यप्पाच्या देवळात स्त्रियांना बंदी असण्याचे कारण ____________

(1) मोहिनी आणि शिव यांच्या संयोगातून अय्यप्पाचा जन्म

(2) केरळातील शबरीमलय येथे दरवर्षी भरणारी यात्रा

(3) पुजाऱ्यांच्या धार्मिक दडपणामुळे

(4) व्रतकाळात ब्रह्मचर्याचे पालन होण्यासाठी स्त्रीदर्शन नको

---

**24.** भारतीय घटनेने कोणते समानतेचे तत्त्व मान्य केले ?

(1) फक्त स्त्रियांनाच मंदिरात प्रवेश मिळावा

(2) स्त्रिया आणि पुरुष यांच्यात भेदभाव करणे योग्य नाही

(3) कार्तिकेय आणि शनी शिंगणापूर मंदिरात स्त्रियांनाही प्रवेश मिळावा

(4) कोणत्याही जाती-धर्मातील स्त्री-पुरुषांना मंदिरात प्रवेश देऊ नये

---

**25.** मंदिरात विशिष्ट गटाला प्रवेश नाकारण्यामागे असणारा हेतू ____________

(1) विशिष्ट गट हे शक्तीने कमकुवत असतात

(2) दुसऱ्यावर श्रेष्ठत्त्वाचा अधिकार गाजविण्याची प्रवृत्ती

(3) पुरुष अधिक पवित्र आहेत-अशी समजूत

(4) स्त्रिया अपवित्र असतात अशी मानसिकता

---

**कच्च्या कामासाठी जागा**

Read the following passage and answer the following questions (**26** to **30**) on it.

Once upon a time there was a professor. He was very proud of his learning. One day he had to go to a village twenty miles away from his city. He set out on foot. After some distance he had to cross the river to go to the village.

He hired a boat and got into it. The boatman was a villager and he was illiterate. The professor wanted to show off his knowledge. When the boat started sailing, he asked the boatman if he knew Shakespeare, the great dramatist ! the boatman said, 'no'. The professor laughed at his ignorance and told him that he had wasted his life. The boatman kept silent.

Now the boat was in the middle of the river. Suddenly there was a storm. It turned the boat upside down. Both the boatman and the professor struggled for life in the water. The professor did not know swimming. He was sure to be drowned. The boatman asked the learned man if he knew swimming. The professor sadly replied that he did not. The boatman laughed at him scornfully. He said, "Learned Sir, you have not only wasted your life but you are also losing it".

**26.** What the professor was proud of ?

(1) His learning (2) Swimming

(3) Shakespeare (4) Ignorance of the boatman

---

**27.** Why did the professor laugh at the boatman ?

(1) because he knew Shakespeare

(2) because he was a villager and he was illiterate

(3) because boatman was ignorant and hence had wasted his life

(4) because boatman gave a negative reply

---

**28.** Choose one correct point of difference between the professor and the boatman

(1) The professor – was learned, didnot know Shakespeare

(2) The professor – was learned, didn't know negative reply

(3) The boatman – was illiterate, knew Shakespeare

(4) The boatman – was illiterate, knew swimming

---

**29.** He was very proud (Rewrite as an exclamatory sentence)

(1) Was he very proud ! (2) How proud he was !

(3) Very proud was he ! (4) Was very proud he !

---

**30.** Write the opposite word for 'politely'

(1) Proudly (2) Scornfully

(3) Laughably (4) Negatively

---

कच्च्या कामासाठी जागा

31. शासनाचे मुख्य कार्यालय कोणते ?

(1) कोकण भवन (2) प्रशासन भवन

(3) मंत्रालय (4) विधान भवन

32. प्रशासकीय लेखनाची वाक्यरचना कशी असावी ?

(1) क्लिष्ट (2) बोजड

(3) सोपी सुटसुटीत (4) गुंतागुंतीची

33. टिप्पणीत कोणत्या प्रकारचे लिखाण करू नये ?

(1) वास्तवदर्शी (2) सुस्पष्ट

(3) धारदार (4) टीकात्मक

34. मंत्री मंडळाची बैठक सामान्यत: कोणत्या दिवशी घेण्यात येते ?

(1) सोमवार (2) बुधवार

(3) शुक्रवार (4) शनिवार

35. परिपत्रकाचा विषय शासन निर्णयाप्रमाणेय शिरोभागी कोणत्या बाजूला लिहीतात ?

(1) उजव्या (2) डाव्या

(3) मधील (4) शेवटच्या

36. चुकीची माहिती देणे किंवा सभागृहापासून माहिती लपवून ठेवणे यास काय म्हणतात ?

(1) नियमभंग (2) वचनभंग

(3) आश्वातनभंग (4) हक्कभंग

37. आमदार, खासदार, न्यायालये इत्यादींना पत्रव्यवहार करताना भाषा कशी असावी ?

(1) सुटसुटीत (2) अनुनयाची

(3) विशेष सौजन्याची (4) सोपी

38. भारतीय राज्यघटनेच्या कलम ________ खाली कार्य नियमावली तयार करण्यात आली असून प्रत्येक विभागाचे विषय यामध्ये नमुद केलेले आहेत.

(1) 166 (2) 162

(3) 163 (4) 309

39. चांगल्या पत्रव्यवहाराची खालील कोणती लक्षणे सांगण्यात येतात ?

(1) अचूकपणा (2) संक्षिप्तपणा

(3) स्पष्टपणा (4) वरील सर्व

**कच्च्या कामासाठी जागा**

40. पृष्ठांकन ________ प्रकारची असतात.
(1) दोन
(2) तीन
(3) चार
(4) अनेक

41. नस्तींचे __________ विभाग पडतात.
(1) एक
(2) दोन
(3) तीन
(4) चार

42. सामान्यत: कोणत्या पत्राची सुरवात "प्रीय श्री" अशा अभियादनाने करतात.
(1) अर्धशासकीय पत्रे
(2) शासकीय पत्र
(3) ज्ञापन
(4) शीघ्र पत्र

43. शब्दाचे शुद्ध रूप ओळखा.
(1) विशेष
(2) विषेश
(3) वीशेष
(4) विषेष

44. शासनाबाहेरील संस्थांशी पत्रव्यवहार करताना खालीलपैकी कोणत्या पद्धतीचा उपयोग केला जातो ?
(1) पत्र
(2) अनौपचारिक संदर्भ
(3) परिपत्रक
(4) शासन निर्णय

45. टिप्पणीमध्ये सातत्य रहावे, मागील टिप्पणी व त्यावरील आदेश पाहून प्रकरण लवकर समजावे व पुढील ________ असा आहे.
(1) निर्णय सुलभ जावे
(2) कार्यवाही करणे शक्य व्हावे
(3) निर्णय घेणे कठीण व्हावे
(4) त्यावरील निर्णय घेणे शक्य व्हावे

46. टिप्पणीस योग्य त्या ____________ लावाव्यात.
(1) चिठ्ठया व पताका
(2) काटकसर चिठ्ठया व पट्टिका
(3) पताका व पट्टिका
(4) तात्काळ व तातडीच्या पताका

47. टिप्पणीत ____________ संदिग्ध व बोजड शब्द, निबंधासारखी शैली टाळावी.
(1) कठीण व साहित्यिक भाषा
(2) भारदस्त व आलंकारिक भाषा
(3) सोपी व अनाकळनीय भाषा
(4) कठीण व आलंकारिक भाषा

48. पत्रात नेमक्या किंवा निश्चित अर्थाचे शब्द वापरावेत, ________________________ शब्द नसावेत.
(1) अस्पष्ट किंवा अचूक
(2) सोपे किंवा अर्थपूर्ण
(3) संदिग्ध किंवा द्वयर्थी
(4) असंदिग्ध किंवा एकार्थी

**कच्च्या कामासाठी जागा**

49. एखाद्या प्रकरणी अत्यंत विलंब झाला असेल तर किंवा कार्यालयीन स्मरणपत्रांचा उपयोग होत नसेल तर ______ वापर केला जातो.
(1) अर्धशासकीय पत्रांचा (2) साध्या पत्रांचा
(3) थोपवणूक ज्ञापनपत्राचा (4) वैयक्तीक साध्या पत्राचा

50. सर्व पत्रव्यवहारात ________ याची संदर्भासाठी दोन्ही बाजूंना आवश्यकता असते.
(1) पत्राचा विषय व क्रमांक (2) पत्र क्रमांक व दिनांक
(3) पत्राचा विषय व दिनांक (4) पत्राचा संदर्भ व क्रमांक

51. खालील 'चार' शब्दांपैकी 'शुद्ध शब्द' शोधा.
(1) उद्योगीकरण (2) औद्योगिकीकरण
(3) औद्योगीकरण (4) उदयोगीकीकरण

52. खालीलपैकी गटात न बसणारा शब्द ओळखा :
गोदावरी, नदी, लंका, गंगा.
(1) गोदावरी (2) नदी
(3) लंका (4) गंगा

53. रिकाम्या जागी योग्य पर्याय भरा :
गो. नी. दांडेकर यांनी सारा देश व सारे गड कोट धुंडाळले. परमेश्वराने त्यांच्या पायावर ________ कोरले आहे.
(1) भिंगरी (2) भाग्य
(3) चक्र (4) नकाशा

54. पुढील समूहात न बसणारा शब्द निवडा.
(1) शंख (2) शंका
(3) संदेह (4) संशय

55. पुढीलपैकी अचूक अर्थ विशद करणारा शब्दसमूह शोधा
बहुश्रुत
(1) ज्याने पुष्कळ ऐकले व वाचले आहे असा
(2) जो पुष्कळ बोलतो
(3) जो पुष्कळ ऐकतो
(4) जो काहीही ऐकत आणि वाचत नाही असा

56. पुढील 'चार' शब्दांपैकी 'शुद्ध शब्द' शोधा.
(1) दिग्विजय (2) दीग्विजय
(3) दिग्वीजय (4) दिक्‌विजय

कच्च्या कामासाठी जागा

**57.** 'उपाहार' या शब्दाचा अचूक अर्थ शोधून लिहा.

(1) भेट (2) अधिक आहार

(3) हॉटेल (4) फराळ

**58.** रिकाम्या जागी योग्य शब्द वापरा.

नाकातून स्पष्ट उच्चार होणाऱ्या अक्षरावर ________ द्यावा.

(1) रफार (2) उभादंड

(3) चंद्रबिंदू (4) अनुस्वार

**59.** खालील स्वर कोणत्या गटात मोडतात ?

अ आ,इ ई , उ ऊ ...

(1) सजातीय (2) विजातीय

(3) संयुक्त (4) ऱ्हस्व

**60.** पुढील वाक्य अचूक पर्याय शोधून पूर्ण करा :

आमचा घरगडी नेहमीच ________

(1) अंग चोरून काम करतो (2) खिडकीतून पळून जातो

(3) कांदेपोहे खातो (4) प्रेतयात्रेला जातो

**61.** पुढील 'चार' पर्यायांतून 'शुद्ध शब्द' ओळखा.

(1) प्रियंवदा (2) प्रियवंदा

(3) प्रियवन्दा (4) प्रियवृंदा

**62.** रिकाम्या जागी योग्य पर्याय भरा.

दुभत्या गाईच्या लाथा ________

(1) गोड (2) कडू

(3) आंबट (4) तुरट

**63.** पुढीलपैकी वेगळा गट ओळखा.

(1) मंगल–अमंगल (2) जबाबदार–बेजबाबदार

(3) तक्रार–विनातक्रार (4) होकारार्थी–सकारार्थी

**64.** पुढीलपैकी शुद्ध शब्दरूप निवडा.

(1) तज्ञ (2) तद्‌ज

(3) तत्ज्ञ (4) तज्ज्ञ

**कच्च्या कामासाठी जागा**

65. पुढीलपैकी शुद्ध शब्द ओळखा.

(1) तसूतसू (2) तसुतसु
(3) तसूतसु (4) तसुतसू

66. 'धीर सोडणे' हा अर्थ सूचित करणारा वाक्प्रचार ओळखा.

(1) हात टेकणे (2) हाडाची काडे करणे
(3) हातपाय गाळणे (4) हातखंडा असणे

67. 'विचार न करता एखाद्याच्या मागून जाणे, परंपराशरणता'. हा अर्थ सूचवण्यासाठी योग्य वाक्प्रचार वापरा.

(1) गतीवर येणे (2) गतानुगतिक
(3) गण्यारावण्याचे प्रसंग (4) गणचौथ पूजणे

68. 'तोंडात बोट घालणे'–या वाक्प्रचाराचा अर्थ ओळखा.

(1) भूक लागणे (2) शरण येणे
(3) नवा हुरूप येणे (4) आश्चर्यचकित होणे

69. रिकाम्या जगी योग्य शब्द वापरा.

गाढवही गेले आणि ____________ गेले.

(1) घोडेही (2) भांडेही
(3) ब्रह्मचर्यही (4) प्रेमही

70. ईरेला पेटणे : या वाक्प्रचाराचा अचूक अर्थ ओळखा.

(1) चूल पेटविणे (2) चुरस वाटणे
(3) जोरात धावणे (4) विस्तव पेटविणे

71. मान तुकविणे : या वाक्प्रचाराचा अचूक अर्थ ओळखा.

(1) निरोप देणे (2) अपयश येणे
(3) शरण जाणे (4) अपमान करणे

72. 'महत्त्वाकांक्षी व्यक्तीला काही मिळत नाही, ती धडपडतच राहते मात्र संन्यस्ताला सारे काही इच्छा नसताना मिळते, असा उफराटा न्याय आहे.'–हे सांगण्यासाठी उचित म्हण शोधा.

(1) ज्यास आहे चातुर्य, त्याचे करिती आश्चर्य
(2) ज्याला नाही प्रतिष्ठा, त्याची काय करावी थट्टा
(3) ज्याला नाही काज, त्याला पृथ्वीचे राज
(4) ज्याला नाही अबरू, तो पडला गबरू

कच्च्या कामासाठी जागा

73. 'इतर लोक संकटात सापडले म्हणून आपण आनंदून जाऊ नये, आपणही लवकरच त्या संकटाचे बळी ठरणार'–हे सूचित करण्यासाठी कोणत्या म्हणीचा वापर करावा ?
(1) त्यांचे संकट आणि आमचा तंटा
(2) जात्यातील रडती, सूपातील हसती
(3) जरी झाला सदाचारी, तरी भिक्षा न मागावी घरोघरी
(4) जेवढी करणी तेवढी भरणी

---

74. 'कोल्हा काकडीला राजी' या म्हणीचा अर्थ ओळखा.
(1) मन कमकुवत होणे
(2) वाईट मार्गाने केलेली कमाई लवकर नष्ट होते
(3) वाईट काम करणाऱ्याच्या मनात डाचत असते
(4) क्षुद्र माणसे क्षुद्र वस्तूंना भाळतात

---

75. 'पाचामुखी परमेश्वर' या म्हणीचा अर्थ ओळखा.
(1) सरपंचाचे मत खरे असते
(2) पुष्कळाचे जे मत तेच खरे
(3) समूहाच्या मताला अर्थ नसतो
(4) पुष्कळाचे मत खरे नसते

---

76. 'कुंपणाने शेत खाणे' या म्हणीचा अर्थ ओळखा.
(1) भक्षणकर्त्याकडून रक्षण होणे
(2) रक्षणकर्त्याकडूनच नुकसान होणे
(3) रक्षणकर्त्याकडून फायदा होणे
(4) रक्षणकर्त्याला तोटा होणे

---

77. 'पी हळद अन् हो गोरी' या म्हणीचा अर्थ ओळखा.
(1) उतावळेपणा दाखविणे
(2) फाजीलपणा दाखविणे
(3) रंग बदलणे
(4) ऐतखाऊ बनणे

---

78. 'उंटावरून शेळ्या हाकणे' या म्हणीचा अर्थ ओळखा.
(1) आळस, हलगर्जीपणाचे काम
(2) दुरून कामावर लक्ष ठेवणे
(3) लांब अंतरावर राहणे
(4) दुरून कामावर लक्ष न ठेवणे

---

79. अचूक वाक्प्रचाराचा पर्याय सुचवा :
अंग टाकणे
(1) पत्करणे
(2) झाकणे
(3) लपविणे
(4) रोडावणे

---

80. भरडले जाणे : या वाक्प्रचाराचा अर्थ ओळखा.
(1) संकटे येणे
(2) पीठ दळणे
(3) लढा देणे
(4) दु:खाचे आघात होणे

---

**कच्च्या कामासाठी जागा**

81. खालील म्हण पूर्ण करण्यासाठी अचूक पर्याय ओळखा.
नावडतीचे मीठ

(1) गुळणी (2) अळणी
(3) पुळणी (4) चुळणी

82. पुढील वाक्प्रचाराशी योग्य अर्थ सांगणारा पर्याय शोधा :
गाशा गुंडाळणे

(1) माशा मारणे (2) निघून जाणे
(3) वाट लावणे (4) चादर पांघरणे

83. Audit :

(1) लेखा (2) जमाखर्च
(3) लेखापरीक्षण (4) हिशोब

84. Gazzette :

(1) करारपत्र (2) मुखपत्र
(3) राजपत्र (4) ताडपत्र

85. अधिसूचना :

(1) Information (2) Notification
(3) Notice (4) Deed

86. Inward :

(1) जावक नोंद (2) आवक नोंद
(3) रोजनिशी (4) हजेरी नोंद

87. 'Superintendent' – या शब्दासाठी मराठीतील पारिभाषिक शब्द ओळखा.

(1) अधीक्षक (2) विशेष अधिकारी
(3) कक्ष अधिकारी (4) सह सचिव

88. Public Accounts Committee – साठी कोणता मराठी पारिभाषिक शब्द वापरला जातो ?

(1) जन हिशोब समिती (2) लोकपाल समिती
(3) लोकलेखा समिती (4) लोकनियंत्रण समिती

89. 'Feminism' या शब्दासाठी मराठीतील पारिभाषिक शब्द ओळखा.

(1) स्त्रीस्वातंत्र्य (2) स्त्रीवाद
(3) महिला–अभ्यूदय (4) महिला मंडळ

कच्च्या कामासाठी जागा

**90.** Medical Storekeeper या शब्दासाठी मराठीतील पारिभाषिक शब्दाचा योग्य पर्याय निवडा.

(1) वैद्यकीय भांडारपाल
(2) वैद्यकीय अभिलेख ग्रंथपाल
(3) वैद्यकीय निरीक्षक
(4) न्यायवैद्यक लिपिक

**91.** खालीलपैकी योग्य विरामचिन्हांचा वापर केलेले वाक्य कोणते ?

(1) मी म्हटलं ; पण साध्या हवेनं एवढाले खडक फुटतात ?
(2) मी म्हटलं, "पण साध्या हवेनं एवढाले खडक फुटतात ?"
(3) मी म्हटलं :- पण साध्या हवेनं एवढाले, खडक फुटतात.
(4) मी, म्हटलं पण साध्या हवेनं एवढाले, खडक फुटतात !

**92.** अधोरेखित शब्दाची जात ओळखा :

मी अभ्यास केला म्हणून उत्तीर्ण झालो.

(1) उभयान्वयी अव्यय
(2) केवलप्रयोगी अव्यय
(3) क्रियाविशेषण अव्यय
(4) अभ्यासदर्शक अव्यय

**93.** अधोरेखित शब्दाचा प्रकार ओळखा.

हुशार मुले-मुली अभ्यासात मग्न आहेत.

(1) गुणविशेषण
(2) संख्यावाचक विशेषण
(3) गणनावाचक विशेषण
(4) आवृत्तिवाचक विशेषण

**94.** अधोरेखित शब्दाचा प्रकार ओळखा.

अशा परिस्थितीत धडपड करावीच लागणार !

(1) सार्वनामिक विशेषण
(2) पृथकत्ववाचक विशेषण
(3) क्रमवाचक विशेषण
(4) क्रियाविशेषण

**95.** रिकाम्या जागी योग्य शब्द वापरा.

क्रियेचे स्थळ, काळ, परिमाण आणि रीत या संबंधी अधिक माहिती सांगणाऱ्या शब्दाला ______________ म्हणतात.

(1) क्रियापद
(2) क्रियाविशेषण अव्यय
(3) संयुक्त क्रियापद
(4) विशेषण

**96.** पुढील वाक्याचा अर्थप्रकार ओळखा.

लवकरच पाऊस पडेल.

(1) आज्ञार्थ
(2) विद्यर्थ
(3) स्वार्थ
(4) उद्‌गारार्थ

**कच्च्या कामासाठी जागा**

97. खालीलपैकी संकेतार्थ सूचवणारे वाक्य कोणते ?

(1) जर मन लावून अभ्यास केला तर हमखास यश मिळेल.

(2) जरा मन लावून अभ्यास कर.

(3) रोज मन लावून अभ्यास करावा.

(4) रोज मन लावून अभ्यास केला का ?

---

98. रीती भविष्यकाळातील वाक्य ओळखा.

(1) सुधाकर पुस्तक वाचील.

(2) सुधाकरने पुस्तक वाचले असेल.

(3) सुधाकर पुस्तक वाचत असेल.

(4) सुधाकर पुस्तक वाचत राहील.

---

99. वाक्यप्रकार ओळखा.

मी नियमितपणे अभ्यास करतो.

(1) केवल वाक्य (2) संयुक्त वाक्य

(3) मिश्र वाक्य (4) सोपे वाक्य

---

100. 'मी तेथे पोहचलो पण आपली भेट झाली नाही' – या वाक्याचा प्रकार ओळखा.

(1) संयुक्त वाक्य (2) मिश्र वाक्य

(3) केवल वाक्य (4) कठीण वाक्य

---

101. 'पाऊस आला म्हणजे आपल्याला पेरणी करता येईल' – या वाक्याचा प्रकार कोणता ?

(1) मिश्र वाक्य (2) संयुक्त वाक्य

(3) केवल वाक्य (4) भविष्य वाक्य

---

102. शब्दाच्या मूळरूपाच्या पूर्वी उपसर्ग लागून जे शब्द तयार होतात त्यांना ______________ म्हणतात.

(1) उपसर्गघटित शब्द (2) प्रत्ययघटित शब्द

(3) सामासिक शब्द (4) देशी शब्द

---

103. खालीलपैकी परभाषीय शब्द कोणता ?

(1) बटाटा (2) बोका

(3) पोट (4) वांगे

---

कच्च्या कामासाठी जागा

104. खालीलपैकी उपसर्गघटित शब्द ओळखा.

(1) आजन्म (2) लेखक

(3) दाता (4) खोदाई

105. खालीलपैकी प्रत्ययघटित शब्द ओळखा.

(1) भवितव्य (2) आडनाव

(3) विज्ञान (4) प्रगती

106. खालीलपैकी अभ्यस्त शब्द ओळखा.

(1) करकर (2) कर

(3) अनुप्रास (4) करकोचा

107. रिकाम्या जागी योग्य पर्याय भरा :

भावे प्रयोगात क्रियापद नेहमी ________________ असते.

(1) नपुंसकलिंगी (2) पुल्लिंगी

(3) स्त्रिलिंगी (4) अनेकलिंगी

108. 'आहे न ____________________ म्हणून तर जगते' योग्य विरामचिन्ह वापरा.

(1) , (2) !

(3) ? (4) :

109. मूळ शब्दाच्या मागे एक किंवा अधिक अक्षरे लावून बनणाऱ्या साधित शब्दांना ________________ म्हणतात.

(1) उपसर्ग (2) प्रत्यय

(3) सिद्ध (4) साधित

110. 'सुसंगति सदा घडो। सुजन वाक्य कानी पडो।' या काव्यओळीत कोणत्या अलंकाराचा उपयोग केला आहे ...?

(1) यमक (2) श्लेष

(3) अनुप्रास (4) रूपक

111. पुढीलपैकी न्यूनत्वबोधक उभयान्वयी अव्यय ओळखा.

(1) आणि (2) पण

(3) म्हणून (4) कारण

कच्च्या कामासाठी जागा

112. खालील 'आज्ञार्थी' क्रियापदामधून काय सुचवले आहे ते ओळखा.
देव तुमचे भले करो
(1) आशीर्वाद (2) उपदेश
(3) विनंती (4) संमती

113. तिरस्कारदर्शक उद्‌गारवाचक अव्यय ओळखा.
(1) अरेरे (2) छट
(3) अहं (4) धन्य

114. 'तो घरी <u>अचानक</u> आला' – अधोरेखित शब्दाचा क्रियाविशेषण प्रकार ओळखा.
(1) कालवाचक (2) स्थलवाचक
(3) रीतीवाचक (4) परिणामवाचक

115. पुढील वाक्यातील रिकामी जागा अचूक पर्यायाने भरा.
शब्दाच्या अक्षरांमधील शेवटच्या अक्षराला __________ म्हणतात.
(1) अन्त्य अक्षर (2) आद्य अक्षर
(3) उपान्त्य अक्षर (4) उपान्त्यपूर्व अक्षर

116. 'मी खात्रीने पास होईन' – या वाक्यातील क्रियापदाचा अर्थ ओळखा.
(1) स्वार्थ (2) आज्ञार्थ
(3) विध्यर्थ (4) संकेतार्थ

117. जेव्हा क्रियापदाच्या रुपावरून उपदेश, प्रार्थना असा अर्थ निघतो तेव्हा त्यास __________ म्हणतात.
(1) स्वार्थ (2) आज्ञार्थ
(3) विध्यर्थ (4) संकेतार्थ

118. रिकाम्या जागी योग्य पर्याय भरा.
मूळ रहिवासी जी मराठी भाषा बोलत होते त्या बोली भाषेतील शब्दांना __________ म्हणतात.
(1) देशी शब्द (2) विदेशी शब्द
(3) परभाषीय शब्द (4) फार्सी शब्द

119. रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहा :
पहिले पद प्रमुख असणाऱ्या समासाला __________ समास म्हणतात.
(1) अव्ययीभाव समास (2) तत्पुरुष समास
(3) द्वंद्व समास (4) बहुव्रीही समास

**कच्च्या कामासाठी जागा**

120. 'आज पाऊस पडावा' – वाक्यप्रकार ओळखा.
(1) केवल (2) मिश्र
(3) संयुक्त (4) गौण

121. 'त्याच्या तालावर पाकोळ्या नाचतात आणि पाखरे त्यांची साथ करतात' – वाक्यप्रकार ओळखा.
(1) संयुक्त (2) केवल
(3) मिश्र (4) गौण

122. 'मला वाटते, हा विषय अगदी सुपरिचित आहे' – वाक्यप्रकार ओळखा.
(1) केवल (2) मिश्र
(3) संयुक्त (4) गौण

123. 'दादा उठले आणि केरूनाना आत गेला ' वाक्यप्रकार ओळखा.
(1) संयुक्त (2) केवल
(3) मिश्र (4) नकारार्थी

124. रिकाम्या जागी योग्य शब्द वापरा.
जेव्हा एखाद्या वस्तूचे वर्णन विशेष चमत्कारजनक करण्याकरिता लोकप्रसिद्धीचा अतिक्रम केलेला असतो तेव्हा वर्णनास ________________ असे म्हणतात.
(1) अतिशयोक्ती (2) उपमा
(3) रूपक (4) श्लेष

125. खालील शब्दांतून 'भाववाचक नाम' शोधा.
(1) चतुराई (2) गोदावरी
(3) सोने (4) राजे रजवाडे

126. खालील 'विध्यर्थ' क्रियापदामधून काय सुचवले आहे ते ओळखा.
तो बहुधा घरी असावा.
(1) आज्ञा (2) योग्यता
(3) कर्तव्य (4) तर्क

127. पुढील काव्यांशातील अलंकार ओळखा.
हाय म्हणत, माय निघे, जाय पळत, पाय मृदुल तरि काय ।।
रडुनि, गळा पडुनि पळामाजि सुताचा स्वआर्द करि काय ।।
(1) अनुप्रास (2) अतिशयोक्ती
(3) श्लेष (4) यथासंख्य

128. अलंकार ओळखा.
'ती गुलाबी उषा म्हणजे परमेश्वराचे प्रेम जणू'
(1) उत्प्रेक्षा (2) श्लेष
(3) भ्रांतिमान (4) अनन्वय

---

129. रिकाम्या जागी योग्य शब्द वापरा.
एकच शब्द वाक्यात दोन अर्थांनी वापरल्यामुळे जेव्हा शब्दचमत्कृती साधते तेव्हा _______ हा अलंकार होतो.
(1) श्लेष (2) उपमा
(3) अनुप्रास (4) रूपक

---

130. मराठीतील काही शब्दांची उत्पत्ती नेमकी कशी झाली हे सांगता येत नाही, त्यांना __________ शब्द म्हणतात.
(1) तद्भव (2) तत्सम
(3) साधित (4) देशी

---

131. पुढील वाक्यातील क्रियापदामधून कोणता अर्थ व्यक्त होतो ते लिहा.
निमंत्रण आले तर मी येईन
(1) स्वार्थ (2) आज्ञार्थ
(3) विध्यर्थ (4) संकेतार्थ

---

132. पुढीलपैकी प्रत्ययघटित शब्द ओळखा.
(1) राजपुत्र (2) पीतांबर
(3) घरदार (4) लालसर

---

133. पुढीलपैकी कृदंत ओळखा.
(1) कर्जाऊ (2) कुंभारीन
(3) बालक (4) टाकाऊ

---

134. 'अरे बापरे ! किती भयंकर माणूस हा !' या वाक्याचा प्रकार ओळखा.
(1) उद्गारार्थी (2) नकारार्थी
(3) होकारार्थी (4) संकेतार्थी

---

135. अलंकार ओळखा.
"वियोगार्थ मीलन होते नेम हा जगाचा ।"
(1) विरोधाभास (2) रूपक
(3) श्लेष (4) उपमा

---

कच्च्या कामासाठी जागा

136. 'दमयंतीचे मुख' चंद्रासारखे सुंदर आहे या वाक्यातील उपमान कोणते ?

(1) चंद्र (2) मुख

(3) दमयंती (4) सुंदर

137. पुढील वाक्यातील 'प्रयोग' ओळखा.
'मांजर उंदीर पकडते'.

(1) कर्मणी (2) कर्तरी

(3) भावे (4) संकर

138. पुढीलपैकी समाहार द्वंद्व कोणता ?

(1) चहापाणी (2) आईबाप

(3) हरिहर (4) रामलक्ष्मण

139. पुढील वाक्यातील 'काळ' ओळखा.
मुले खेळत असतील.

(1) पूर्ण भविष्यकाळ (2) साधा भविष्यकाळ

(3) अपूर्ण भविष्यकाळ (4) रीती भविष्यकाळ

140. 'त्याच्या मनावर रक्ताचे पिंपळपान उमटले' – अलंकार ओळखा.

(1) यमक (2) उत्प्रेक्षा

(3) रूपक (4) श्लेष

141. रिकाम्या जागी योग्य पर्याय भरा.
श्रुतलेखन म्हणजे ____________

(1) विरामचिन्हांसह लेखन (2) छापलेला उतारा पाहून वहीत उतरवणे

(3) अवतरणचिन्ह (4) अपसारणचिन्ह

142. 'गुरुजी म्हणाले. पृथ्वी सूर्याभोवती फिरते या वाक्याचे मिश्रवाक्य खालील पर्यायांतून शोधा.

(1) गुरुजी म्हणाले, की, पृथ्वी सूर्याभोवती फिरते

(2) गुरुजी म्हणाले आणि पृथ्वी सूर्याभोवती फिरली

(3) 'पृथ्वी सूर्याभोवती फिरते' असे गुरुजी म्हणाले

(4) गुरुजी म्हणाले म्हणून पृथ्वी सूर्याभोवती फिरते

कच्च्या कामासाठी जागा

143. 'अमृताहुनि गोड नाम तुझे देवा ।।' अलंकार ओळखा.

(1) उत्प्रेक्षा (2) रूपक
(3) श्लेष (4) व्यतिरेक

144. संख्याविशेषण प्रकार ओळखा.

(1) वाईट सवयी (2) उंच झाडे
(3) लाख रुपये (4) कैरीचे लोणचे

145. खालील वाक्यांतील 'समुच्चय बोधक उभयान्वयी' अव्यय ओळखा.

(1) मरावे परी कीर्तिरूपी उरावे
(2) विजा चमकू लागल्या आणि पावसाला सुरूवात झाली
(3) सायकल वाटेत नादुरुस्त झाली सबब मला उशीर झाला
(4) एक रुपया म्हणजे शंभर पैसे

146. 'असा पक्षी लक्षी बहुविहग लक्षी न उडता ।' अलंकार ओळखा.

(1) रूपक (2) उत्प्रेक्षा
(3) श्लेष (4) अर्थांतरन्यास

147. उपमेयासारखेच उपमेय. त्याला दुसऱ्या कशाचीच उपमा देता येत नाही, असे वर्णन केल्याने ________ अलंकार होतो.

(1) भ्रांतिमान (2) अनन्वय
(3) अतिशयोक्ती (4) अपन्हुती

148. अनुनासिकाला काय म्हणतात ?

(1) अनुस्वार (2) शब्द
(3) व्यंजन (4) विशेषण

149. खाली दिलेल्या सामासिक शब्दाचा प्रकार ओळखा.
चौकोन

(1) अव्ययीभाव (2) द्वंद्व
(3) तत्पुरुष (4) बहुव्रीही

150. पुढील समूहातील 'अयोग्य' सामासिक शब्द ओळखा.

(1) अनंत (2) चक्रपाणी
(3) सहकुटुंब (4) रामलक्ष्मण

कच्च्या कामासाठी जागा

**सूचना – (पृष्ठ 1 वरून पुढे....)**

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत: बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षाकक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग – 1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

## नमुना प्रश्न

प्रश्न क्र. 201. "अंगावर काटा उभा रहाणे" या वाक्प्रचाराचा अर्थ काय ?

(1) अंग शहारणे (2) रोमांचित होणे

(3) अतिशय भिती वाटणे (4) बहरुन येणे

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) अतिशय भिती वाटणे" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव **खालीलप्रमाणे** प्र. क्र. 201 समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्र.क्र. 201. ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

**कच्च्या कामासाठी जागा**

SEAL